# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.02.2025** **वारःमंगळवार**

---

१. भारतीय शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या किमान एका तरी पदार्थाचा जगातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात समावेश असावा हे आपलं स्वप्न -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

२. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आजपासून बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात दौरा

३. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ॲडव्हान्टेज आसाम परिषदेचं उद्घाटन होणार

४. मानवी हक्क संरक्षण आणि संवर्धनात भारत नेहमीच सक्रिय - परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचं संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेत प्रतिपादन

आणि

५. आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि न्यूझीलंड उपांत्या फेरीत दाखल

**<u>पीएम किसान</u>**

भारतीय शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या किमान एका तरी पदार्थाचा जगातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात समावेश असावा हे आपलं स्वप्न असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शेतमालाची निर्यात, अन्नप्रक्रिया आणि विपणन यांना प्रोत्साहन देऊन सरकार हे स्वप्न साकार करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे असं त्यांनी सांगितलं. पंतप्रधानांच्या यांच्या हस्ते काल बिहारमधल्या भागलपूर इथून पीएम किसान योजनेचा १९वा हप्ता वितरीत करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

मखाण्याला प्रोत्साहन देणं हादेखील या प्रयत्नांचाच एक भाग असल्याचं मोदी यांनी सांगितलं. मखाणा मंडळाच्या स्थापनेनंतर जागतिक बाजारातली मखाण्याची निर्यात वाढेल आणि उत्पादन, मूल्यवृद्धी आणि विपणन यातही मदत होईल असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. देशाच्या पूर्व भागात अन्न प्रक्रिया उद्योगाला प्रचंड वाव आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय परदेशी व्यापार व्यवस्थापन संस्था आम्ही बिहारमध्ये स्थापन करत आहोत असं त्यांनी सांगितलं. यावेळी पंतप्रधानांनी बिहारमध्ये भागलपूर, मुंगेर आणि बक्सर इथं आंबा, टोमॅटो, कांदा, बटाट्यासाठी सर्वोत्कृष्टता केंद्र उभारणार असल्याची घोषणा केली.

यावेळी एकंदर २२ हजार ७०० कोटी रुपये ९ कोटी ८० लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. पीएम किसान योजनेला सहा वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**<u>पीएम किसान मुख्यमंत्री</u>**

दरम्यान, महाराष्ट्रात नागपूर इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पीएम किसान योजनेचा १९वा हप्ता वितरित करण्यात आला. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना पंतप्रधान कृषी सन्मान योजनेअंतर्गत 6 हजार रुपये मिळत आहेत. यामध्ये राज्य शासनाच्या नमो कृषी सन्मान योजनेअंतर्गत 6 हजार रुपये आणि राज्य शासनातर्फे आणखी 3 हजार रुपये वाढ करून शेतकऱ्यांच्या खात्यात आता दरवर्षी 15 हजार रुपये जमा होतील अशी घोषणा फडणवीस यांनी यावेळी केली.

**<u>राष्ट्रपती दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून पांच दिवस  बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी आज राष्ट्रपती बिहारमधील पाटणा वैद्यकीय महाविद्यालयाच्या शताब्दी समारंभाला उपस्थित राहतील. उद्या त्या मध्य प्रदेशातील छत्रपुर मधल्या गाढा इथं बागेश्वर जनसेवा समितीच्या वतीनं आयोजित सामूहिक विवाह समारंभाला उपस्थित राहतील. त्यानंतर त्या गुजरात मध्ये स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं श्रद्धांजली अर्पण करून, केवडिया इथं  नर्मदा आरतीमध्ये सहभागी होतील.

केवडिया मधल्या एकता कौशल्य विकास केंद्राला राष्ट्रपती मुर्मू भेट देणार आहेत. तसंच अहमदाबादमधल्या  नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनच्या तसंच गांधीनगर मधल्या नॅशनल फॉरेन्सिक सायन्सेस युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभाला त्या उपस्थित राहणार आहेत. यानंतर स्मृतीवन भूकंप स्मारक आणि युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ असलेल्या धोलावीराला त्या भेट देणार आहेत.

**<u>पंतप्रधान आसाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाममधल्या गुवाहाटी इथं आज ॲडव्हान्टेज आसाम या गुंतवणूक आणि पायाभूत सुविधाविषयक परिषदेचं उद्घाटन होणार आहे. उद्घाटन समारंभाला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, केंद्रिय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, आसामचे राज्यपाल एल. पी. आचार्य आणि मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा उपस्थित राहणार आहेत.  दोन दिवसांच्या या परिषदेत आयोजित विविध सत्रांमध्ये औद्योगिक सुधारणा,जागतिक व्यापार भागीदारी आणि आसाममधील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान, काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत गुवाहाटी इथं झुमोर बिनंदिनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आसाम राज्य सरकारनं आयोजित केलेल्या या नेत्रदीपक सोहोळ्यात ८ हजार नर्तक आणि ढोलवादकांनी पारंपरिक झुमोर नृत्य सादर केलं. आसाममधल्या चहा उद्योगाला दोनशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त तिथल्या चहाची शेती करणाऱ्या समुदायाची समृद्ध संस्कृती साजरी करण्यासाठी हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांच्यासह सुमारे ६० देशांच्या वकीलांतीमधले प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

**<u>अमित शहा</u>**

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल वतन को जानो या कार्यक्रमाअंतर्गत जम्मू आणि काश्मीर राज्यातल्या युवा पिढीशी संवाद साधला. जम्मू आणि काश्मीरमधले २५० महाविद्यालयीन आणि शालेय

विद्यार्थी नवी दिल्लीत आले आहेत. कलम ३७० रद्द करुन केंद्र सरकारनं देश एकसंध केला असून आता जम्मू काश्मीरमधल्या जनतेला देशातल्या अन्य राज्यांमधल्या नागरिकांप्रमाणेच सगळे अधिकार मिळतील असं शहा म्हणाले. या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांनी आपापल्या गावात गेल्यानंतर आपल्या कुटुंबियांशी, नातेवाईकांशी शांतता, सलोखा आणि विकासाबाबत चर्चा करावी असं आवाहन शहा यांनी केलं. हा देश प्रत्येक नागरिकाचा आहे आणि हा विश्वास जम्मू काश्मीरमधल्या लोकांमध्ये रुजवणं महत्त्वाचं असल्याचं शहा म्हणाले.

**<u>जय शंकर</u>**

मानवी हक्कांच्या संरक्षण आणि संवर्धनात भारतानं नेहमीच सक्रिय भूमिका बजावली आहे असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. जिनिव्हा मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेच्या ५८ व्या अधिवेशनाला त्यांनी काल दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. भारताचा दृष्टिकोन आपल्या भागीदारांच्या प्राधान्यक्रमानुसार, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा बळकट करण्यावर केंद्रित आहे असं त्यांनी यावेळी सांगितलं. भारतानं नेहमीच दहशतवाद सहन करण्याला विरोध केला आहे. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी भारताची भूमिका नेहमीच ठाम राहिली आहे, यावर त्यांनी भर दिला. समकालीन जागतिक वास्तवाचं प्रतिबिंब उमटवणाऱ्या बहुपक्षीय प्रणालीची तातडीची गरज असल्याचं जयशंकर यांनी नमूद केलं.

**<u>महाकुंभ महाशिवरात्रि</u>**

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या ऐतिहासिक महाकुंभाचा उद्या महाशिवरात्रीच्या पर्वावर अधिकृत समारोप होत आहे. हा सोहळा नेत्रदीपक आणि अविस्मरणीय करण्यासाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे. भाविकांच्या सुरक्षा आणि सुविधांसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यासंदर्भात दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ती सर्व पावले उचलण्यात आली आहेत, असं प्रयागराजचे जिल्हाधिकारी रवींद्र कुमार मांदड यांनी सांगितलं. प्रयागराज मध्ये नियमित स्वच्छता केली जात असून भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>ग्रामविकास मंत्री सरस</u>**

केंद्रिय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते आज उत्तर प्रदेशात नोएडा हाट इथं सरस आजीविका मेळ्याचं उद्घाटन होणार आहे. हस्तकला कारागीरांची उपजीविका आणि सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं ग्रामविकास मंत्रालयानं राष्ट्रीय ग्राम विकास आणि पंचायत राज संस्थेच्या सहकार्यानं हा मेळा आयोजित केला आहे. विविध राज्यांमधल्या स्वयंसहायता गटाच्या लखपती दिदींच्या हस्तकलेची निर्यातक्षमता विकसित करण्यावर या मेळ्यात विशेष भर देण्यात आला आहे. येत्या १० मार्चपर्यंत हा मेळा सुरू राहील.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल पाकिस्तानमधल्या रावळपिंडी इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं बांगलादेशवर ५ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना नजमुल हुसेन शांतोच्या ७७ धावांच्या खेळीमध्ये बांगलादेशने निर्धारित ५० षटकांत ९ बाद २३६ धावा केल्या.प्रत्युत्तरात न्यूझीलंडनं ४६ षटकं आणि १ चेंडूत ५ बाद २४० धावा केल्या. न्यूझीलंडकडून मायकेल ब्रेसवेलनं ४ बळी घेतले तर रचिन रवींद्रनं सर्वाधिक ११२ धावा केल्या. मायकेल ब्रेसवेलला सामनावीर घोषित करण्यात आले. या विजयामुळे पाकिस्तान आणि बांगलादेश हे दोन्ही संघ या स्पर्धेतून बाहेर पडले आहेत, तर भारत आणि न्यूझीलंडनं उपांत्य फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं आहे. अ गटात आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये ,दोन विजयांसह भारत आणि न्यूझीलंडचे प्रत्येकी चार गुण आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला पुढील सामना 2 मार्च रोजी होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**